**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं  निधन/ सर्वत्र शोककळा - मान्यवरांनी वाहिली आदरांजली

- महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची वेळ आली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- या विषयावर येत्या २९ एप्रिलनंतर सर्वपक्षीय बैठक बोलवावी अशी काँग्रेसची मागणी

**आणि**

- अमरनाथ यात्रा यंदा येत्या ३ जुलैपासून

**<><><><><>**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं आज मुंबईत  निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली. आशा भोसले यांचं पार्थिव लोअर परळ इथल्या त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार होतील.

वयाच्या १०व्या वर्षापासून गायनक्षेत्रात पदार्पण करणाऱ्या आशा भोसले यांच्या प्रदीर्घ यशस्वी कारकिर्दीचा थोडक्यात घेतलेला आढावा आमच्या प्रतिनिधीकडून ऐकूया…

- **- - - कॅप्सूल- - - -**

**<><><><><>**

आशा भोसले यांच्या  निधन वार्तेनं सर्वत्र शोककळा पसरली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आशा भोसले यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्णाण झाल्याचं शोकसंदेशात म्हटलं आहे. आशा भोसले यांच्या निधनामुळे आपल्याला तीव्र दुःख झालं असल्याचं **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी म्हटलं आहे**.** आपल्या शोकसंदेशात ते म्हणतात. अनेक दशकांच्या त्यांच्या संगीत कारकिर्दीत त्यांनी जगभरात ख्याती मिळवली होती.  आजचा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत दुःखाचा आहे. आपल्या सुमधुर आवाजाने आणि अलौकिक प्रतिभेनं भारतीय संगीत क्षेत्राला समृद्ध करणाऱ्या आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली, असं केंद्रीय गृहमंत्री **अमित शहा** आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत. आशा ताईंनी

अखेरच्या श्वासापर्यंत आपलं जीवन संगीत क्षेत्राला वाहून घेतलं होतं. आज आपण अशा गायिकेला मुकलोय जिने भारताचं नाव जगभरात प्रसिद्ध केलं. आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली, अशा शब्दात केंद्रीय मंत्री **नितीन गडकरी** यांनी शोक व्यक्त केला आहे.

सुमधुर स्वर आणि अतुलनीय गायनाचा मूर्तिमंत आविष्कार असलेल्या आशा भोसले यांनी, गेल्या अनेक दशकांमध्ये भारतीय संगीताला यशाच्या नव्या शिखरांवर नेऊन ठेवलं. त्यांच्या निधनाने लक्षावधी चाहत्यांची कधीही भरून न येणारी हानी झाल्याची भावना केंद्रीय मंत्री **पीयूष गोयल** यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने आणि संगीतातील व्यापक योगदानाने संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य करणाऱ्या आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली, असं **राज्यपाल जिष्णु देव वर्मा** यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

आशाताई आणि मंगेशकर कुटुंबाने संगीताची अविरत सेवा केली. लतादीदींच्यानंतर, आशाताईंच्या निधनाने संगीतातला दुसरा तारा निखळल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली.

**होल्ड... बाईट - मुख्यमंत्री**

गानसम्राज्ञी आशा भोसले यांच्या दुःखद निधनाने गेल्या चार पिढ्यांची मने संगीताच्या बहरात चिंबचिंब करणारा, आणि मनामनांना एका चंदेरी दुनियेच्या सफरीचा आनंद देणारा दैवी आवाज शांत झाला आहे, अशी शोकभावना **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनी व्यक्त केली आहे.

आशाताईंच्या निधनाने संगीत क्षेत्रातल्या एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून, सुरांची 'सम्राज्ञी' काळाच्या पडद्याआड गेली आहे, अशा शब्दांत **उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार** यांनी आपली शोकभावना व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची, तसंच २०२९ ला होणार असलेल्या लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका महिला आरक्षणाच्या तरतुदीसह पार पडतील याची सुनिश्चिती करण्याची वेळ आली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी लोकसभा आणि राज्यसभेतल्या विविध पक्षांच्या

गटनेत्यांना पत्र लिहीलं आहे. सर्व सदस्यांनी, महिला आरक्षण कायद्यातल्या सुधारणेसाठीचं, नारी शक्ती वंदन अधिनियम एकमतानं संमत करण्यासाठी एकत्र यावं असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी या पत्रातून केलं आहे.

येत्या १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन होणार आहे**.**

<><><><><>

मतदारसंघांची पुनर्रचना आणि  इतर संबंधित तपशिलांशिवाय महिला आरक्षण कायद्यावर कोणतीही उपयुक्त चर्चा करणं शक्य नसल्याचं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात प्रधानमंत्र्यांनी लिहीलेल्या पत्राच्या उत्तरात खर्गे यांनी येत्या २९ एप्रिल रोजी विविध राज्यांमध्ये सुरु असलेल्या विधानसभा निवडणुकांचे सर्व टप्पे पूर्ण झाल्यावर, या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी अशी मागणी केली आहे.

<><><><><>

या विषयावर १६ ते १८ एप्रिल दरम्यान होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनात उपस्थित राहण्याचा पक्षादेश भारतीय जनता पार्टीनं आपल्या सर्व खासदारांसाठी काढला आहे.

<><><><><>

वार्षिक अमरनाथ यात्रा यंदा ३ जुलै ते २८ ऑगस्ट दरम्यान असेल अशी घोषणा जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये केली आहे. ज्येष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने २९ जून रोजी भगवान शिवाची प्रथम पूजा होईल.

//<><><><><>//